Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# शिवकालीन प्रशासन

**संपादक**

**डॉ.मुक्ता गोविंदराव सोमवंशी**

**डॉ.अशोक काकासाहेब जाधव**

**डॉ.बळीराम रेश्माजी शिंदे**

कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय सोनपेठ
ता. सोनपेठ जि.परभणी

**आधार पब्लिकेशन्स, अमरावती**

Late Ramesh Warpudkar ACS College ★ Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani ★

# शिवकालीन प्रशासन

■ प्रथम आवृत्ती – १९, फेब्रुवारी २२

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.

हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,

वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती

मो. ९५९५५६०२७८

email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार

सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,

कठोरा रोड, अमरावती

■ Price : 400/-

ISBN -978-93-91305-87-1

सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

| | | |
|---|---|---|
| 12 | स्वराज्य संस्थापक शिवाजी महाराज यांचा स्त्री विषयक दृष्टिकोन<br>प्रा. गोपाल विश्वनाथ चौधरी | 77 |
| 13 | शिवकालीन सैन्य प्रशासन मरकंटे कौशल्या रामचंद्र | 82 |
| 14 | शिवकालीन महसूल प्रशासन प्रफुल्ल लक्ष्मण किरवले | 92 |
| 15 | शिवकालीन राज्यव्यवस्था<br>प्रा. संदीप सुरेश देशमुख / प्रा.निखिल गणेश जगताप | 99 |
| 16 | छत्रपती शिवाजी महाराजांचे कृषिविषयक धोरण व जल व्यवस्थापन प्रा. डॉ. वितेश भारत निकते | 106 |
| 17 | शिवकालीन प्रशासनव्यवस्था प्रा. डॉ. जाधव अशोक | 117 |
| 18 | शिवाजी महाराजांचे स्त्री विषयक धोरण प्रा. किशम मिराशे | 127 |
| 19 | शिवकालीन किल्ले प्रशासन डॉ. मोहन मिसाळ | 136 |
| 20 | छत्रपती शिवाजी महाराजांची गुप्तहेर यंत्रणा व त्यांच्या धाडसी यशस्वी मोहिमा डॉ.अंभुरे एस.डी. | 139 |
| 21 | शिवकालीन महसुल व्यवस्था अर्जुन अशोक मोरे | 145 |
| 22 | श्री शिव छत्रपतींची अर्थनीती प्रा डॉ अंबादास पांडुरंग बर्वे | 151 |
| 23 | शिवकालीन न्यायव्यवस्थेचे ऐतिहासिक अध्ययन<br>डॉ.आरगडे अंबादास | 157 |


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

# छत्रपती शिवाजी महाराजांची गुप्तहेर यंत्रणा व त्यांच्या धाडसी यशस्वी मोहिमा

डॉ.अंभुरे एस.डी.
इतिहास विभाग कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ.
मो: 9511954276 ,ईमेल: shivajiambhure0104@gmail.com

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

---

प्रस्तावना:-

संपूर्ण हिंदुस्थानच्या इतिहासात मराठ्यांच्या इतिहासाला फार महत्त्वाचं स्थान आहे कारण मराठ्यांचा इतिहास हिंदुस्थानच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाचं पर्व अर्थात सोनेरी पान म्हटले गेले आहे छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याच्या अठराव्या शतकात भारतातील एक प्रमुख राजकीय सत्तेत रूपांत झाले छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वदेश प्रेम .शोध राष्ट्र निर्मितीची प्रक्रिया. स्वाभिमान. राष्ट्रीय अस्मिता जागृत करून स्वराज्य स्थापन केले विजापूरच्या आदिलशहाने शिवाजी महाराजांचे वडील शहाजीराजांना पुणे. चाकण. सुपे व इंदापूर हे चार परगणे दिले होते ह्यात चार परगण्याची जहागिरी छत्रपती शिवाजी महाराजांना मिळाली होती परंतु शिवाजी महाराजांनी छोट्या जागीरदारीचे रूपांतर स्वराज्यात निर्माण केले स्वराज्य निर्माण करण्यासाठी त्यांनी अनेक धाडसी मोहिमा काढल्या व मिर्झाराजा जयसिंग यांची स्वारी सोडली तर सर्वच स्वाऱ्यात छत्रपती शिवाजी महाराज यशस्वी झाले त्याला एकमेव कारण शिवाजी महाराजांचे धाडस व त्यांची गुप्तहेर यंत्रणा छत्रपती शिवाजी महाराजांचं गुप्तहेर यंत्रणा अतिशय चांगली व अत्यंत बारीकसारीक गोष्टीची माहिती काढणारे होते कारण शिवाजी महाराजांनी प्रत्येक मोहिमेवर जात असताना तेथील सर्व माहिती काढली होती युद्धाचाच बाबतीत नाही तर अनेक सामाजिक दृष्टीने माहिती काढण्यासाठी किंवा कोणत्या भागात कोणता वतनदार अन्याय अत्याचार करीत आहे याची माहिती देखील गुप्तहेर मार्फत काढली होती

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin:-431516 Tq Sonpeth Dist.Parbhani

हेतू किंवा उद्देश:-

१) छत्रपती शिवाजी महाराजांच्या धाडसी मोहिमेची माहिती सर्वसामान्यांना कळावे

२) छत्रपती शिवाजी महाराजांचे गुप्तहेर माहिती अभ्यास करणे

३) स्वराज्य निर्मितीसाठी शिवाजी महाराजांनी घेतलेले धाडसी निर्णय

४) गुप्तहेर यंत्रणा व शिवाजी महाराज स्वतः व प्रशासनात झालेल्या फायद्याची माहिती

३) छत्रपती शिवाजी महाराजांनी इ.स.१६४६ मध्ये शिवराज मुद्रा काढली ही मुद्रा संस्कृत भाषेत होती शहाजीचा पुत्र शिवाजी महाराज शुद्ध पक्षातील प्रतिपदेच्या चंद्रलेखे प्रमाणे (दिवसेंदिवस ) हळूहळू वाढत जाणार हो विश्वातील सर्वांना मान्य होणारी ही मुद्रा होती

३) छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याची ध्येय उद्दिष्ट समोर ठेवून अनेक धाडसी मोहिमा काढल्या या धाडसी मोहिमेमध्ये शिवाजी महाराजांचा प्रामुख्याने आदिलशाही व मोगल शाही यांच्याबरोबर संघर्ष करावा लागला शिवाजी महाराज त्यांनी आपल्याला केवळ चार परगणे मिळाले होते परंतु त्यांनी बारा मावळ प्रांत जिंकून तेथील अनेक मातब्बर सरदार आपल्याकडे ओढून घेतले प्रथम त्यांनी कोंढाणा किल्ला जिंकून नंतर राजगड .पुरंदर. शिवनेरी. लोहगड. इ. अनेक किल्ले जिंकून घेतले हे किल्ले जिंकून घेत असताना त्यांनी प्रत्येक स्वाऱ्यामध्ये गुप्तहेर यंत्रणा यांच्याकडून फार मोठी बारीक-सारीक माहिती काढली होती व नंतर त्या ठिकाणी धाडसी मोहिमा केले आहेत

१) जावळीचा विजय

छत्रपती शिवाजी महाराजांनी 15 जानेवारी सोळाशे 56 रोजी जावळीच्या चंद्रराव मोरे यांचा पराभव केला या मोहिमेचे नेतृत्व स्वतः शिवाजी महाराजांनी केले शिवाजी महाराज कान्होजी जेधे. बांदल देशमुख सूर्याजी काकडे रघुनाथ बल्लाळ. बाबाजी राऊत. हनुमंतराव मोरे इत्यादी सरदार बरोबर होते जावळीचे चंद्रगुप्त मोरे यांचे वंशज समजत असत भोसले घराणे आपल्याबरोबरीचे नाहीत

Late Ramesh Warpudkar ACS College * Sonpeth Pin-431516 * Tq.Sonpeth Dist.Parbhani

`चंद्रराव ` हा किताब किताब होता हा किताब आदिलशहाकडून मिळत होता हा किताब मिळाला नंतर मोरे चंद्र राव हे नाव लावत असत मोरेना मागील नऊ पिढ्या पासून हा किताब दिला जात होता मोरे स्वतःला जे समजत असत तेव्हा शिवाजी महाराजांनी तेथील धनसंपत्ती पाहून आपल्या प्रदेशाचा विस्तार हवा आणि किल्ल्याची प्राप्ती व्हावी इत्यादीसाठी प्रथम शिवाजी महाराजांनी गुप्तहेर आखडून जावळीच्या मोरे ची माहिती काढली व जावळीच्या चंद्रराव मोरे यांचा पाडाव केला जावळीच्या विजयामुळे शिवाजी महाराज फार मोठ्या मनुष्यबळाची प्राप्त झाली

२) अफजलखानाचा वध व गुप्तहेर यंत्रणा

जाळू विजयानंतर आदिलशहाला फार मोठा धक्का लागला होता शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी आदिलशाही सुलतान मुहम्मद त्याच्या मृत्यूनंतर आली आदिलशहा सत्तेवर आला सत्तेची खरी सूत्रे त्याची आई बंडी बेगम त्याच्या हातात होते बडी बेगम यांनी शिवाजी महाराजांच्या विरोधात अफजलखानाची निवड केली रूपाने फार मोठे संकट आले होते कारण तो अत्यंत पराक्रमी कर्तबगार स्वामीनिष्ठ सेनापति होता तसा तो शत्रु होता त्याला वाईच्या प्रदेशाची संपूर्ण माहिती होती तो होता अशा स्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजल खाना बरोबर युक्तीने संघर्ष केला व अफजल खानाचा वध केला प्रथम अफजल खानाने आपला वकील भास्कर कुलकर्णी शिवाजी महाराजांचे भेटीस पाठवले तेव्हा शिवाजी महाराज आपण फार भीत आहोत असं दाखवून अफजलखानाची मर्जी संपादन केली व शिवाजी महाराजांनी आपला वकील पंताजी गोपीनाथ अफजलखान कडे पाठवून खान जावळी कडे येण्यास विनंती केली शिवाजी महाराज अफजल खानाची भेट १० नोव्हेंबर १६५९ रोजी झाली अफजल खानाचा हेतू शिवाजी महाराजांनी गुप्तहेर मार्फत शोधून काढला होता. शिवाजी महाराजांनी अगोदरच संपूर्ण तयार करून अफजल खानाचा वध केला शिवाजी महाराजांची गुप्तहेर यंत्रणा कमकुवत असती तर शिवाजी महाराजांना अफजल खानाला मारता आले नसते या संघर्षात शिवाजी महाराजांची बरेवाईट झाले असते तर मराठ्यांचा इतिहास येथे संपला असता

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin:-431516 Tq.Sonpeth Dist.Parbhani

शिवाजी महाराजांनी आपल्या गुप्तहेर मार्फत अफजल खान यांची संपूर्ण माहिती काढली त्याने योजना आखली

३) शाहिस्तेखान स्वारी व शिवाजी महाराजांची गुप्तहेर यंत्रणा

अफझलखानाच्या वधानंतर मोगल बादशहा औरंगजेबाने शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी शाहिस्ते खानाची नेमणूक केली शाहिस्तेखान हा औरंगजेबाचा मामा होता त्याने प्रथम चाकणचा उत्तर कोकणावर हल्ला केला. परंतु दोन्ही मध्ये शिवाजी महाराजांचा पराभव केला नंतर शाहिस्तेखान पुण्याच्या लाल महालात तीन वर्षे होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी शाहिस्ते खानावर आक्रमण करण्यापूर्वी खान लाल महालात कोण्या ठिकाणी राहतो तो जेवतो कुठे तो झोपतो कुठे याची बारीकसारीक माहिती द्यावी शिवाजी महाराजांची हेर यंत्रणा एवढी उत्कृष्ट व प्रामाणिक होती की तेथील अचुक माहिती शिवाजी महाराजांना मिळत होती तसेच शिवाजी महाराजांनी आपल्या गुप्तहेर मार्फत जसवंत सिंग यांना तसच राहिला भाग पाडले व ०५ एप्रिल १६६३ रोजी शाहिस्तेखानाचा पराभव केला शाहिस्ते खानाचा पराभव केला त्याची बोटे तोडली.

४) सुरत लुट व शिवाजी महाराजांची गुप्तहेर यंत्रणा

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या धाडसी व गुप्तहेर यंत्रांच्या जीवावर मोगलांचे संपन्न असे सुरत शहर ६.७.८.९. जानेवारी १६६४ या चार दिवसात लुटले कारण शाहिस्तेखानाने मागील तीन वर्षात महाराष्ट्रातील जनतेला फार मोठा त्रास दिला होता व तीन वर्षात महाराजांचा महसूल बुडाला होता त्यामुळे महाराजांची फार मोठे आर्थिक नुकसान झाली होती तेव्हा शिवाजी महाराजांनी सुरत शहर लुटायच्या पूर्वी आपला हेर यंत्रणा प्रमुख नाईक यांनी सुरत मधील संपूर्ण माहिती काढली होती सुभेदार इनायतखान हा लालची स्वभावाचा होता त्याच्यावर सुरत शहराची संरक्षणाची जबाबदारी होती परंतु तो भ्रष्टाचारी होता व सुरज च्या किल्ल्यावर आरामात राहत असे ही माहिती काढली तसेच सुरत मधील श्रीमंत व्यापारी कोण कोण आहेत याचीदेखील माहिती काढली शिवाजी महाराजांनी सुरत 4 दिवस लुटले सुरत शहरामधील एकूण दोन लाख लोकसंख्येपैकी

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Dist. Parbhani

फक्त वीस हजार लोक सुरतमध्ये राहिले एवढी दहशत शिवाजी महाराज सूरत मधील लोकांना बसवली औरंगजेबला फार मोठी दहशत बसवली याचा परिणाम पुढे औरंगजेबाने मिर्झा राजे जयसिंग आला महाराष्ट्रात पाठवले

५) आग्रा भेट व शिवाजी महाराजांचे गुप्तहेर यंत्रणा

सुरत शहर लुटल्यानंतर औरंगजेबाने शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी मिर्झाराजा जयसिंग याला महाराष्ट्रात पाठवले मिर्झाराजा जयसिंह शिवाजी महाराज प्रमाणे पराक्रमी धाडसी असून त्याने कधीच आपला पराभव करून घेतला नव्हता तेव्हा शिवाजी महाराजांनी पण आणि त्यांच्या बरोबर दोन पावले मागे येऊन पुरंदरचा तह केला पुरंदरच्या तहानुसार शिवाजी महाराजांनी आग्रा भेटीच्या आमंत्रण स्वीकारले शिवाजी महाराजांना मिर्झाराजे यांनी शब्द दिला की तुम्हाला काही होणार नाही तेव्हा शिवाजी महाराज १० मे १६६६ रोजी आग्रा येथे पोचले व १२ मे१६६६ रोजी औरंगजेब शिवाजी भेट झाली व शिवाजी महाराजांना झाली तिथे नजर केद झाल्यानंतर शिवाजी महाराजांनी आपल्या गुप्त यामार्फत म्हणजेच बहिर्जी नाईक कडून आग्र्याहून सुटकेचे योजना सुरू केली व त्यात यशस्वी झाले शिवाजी महाराजांनी निराजीपंत. त्र्यंबक पंथ. दत्तोजी पंथ. येसाजी कंक. फीरोजी फर्जद. मदारी मेहतर. बाजी जेधे यांच्या बरोबर गुप्त योजना आखली त्या योजनेनुसार मिठाईच्या वाटण्याच्या पेटाऱ्यात शिवाजी महाराज व शंभू महाराज यांनी आपली आग्र्याहून सुटका करून घेतली या सुटकेनंतर शिवाजी महाराजांची संपूर्ण भारतात वाहवा झाली व औरंगजेबाचे नाक कापले गेले व शिवरायांना जवळून पाहता आला म्हणजे शिवाजी महाराज यांचे सहा आत्मविश्वास कल्पकता तेरी सपणा इत्यादी गुणाचे दर्शन होईल

६) समारोप

वरील लेखांमध्ये शिवाजी महाराजांच्या धाडसी योजनांमधून शिवाजी महाराजांचे धाडस .पराक्रम. बुद्धीचा तुरे आत्मविश्वास इत्यादी गुण दिसून येतात शिवाजी महाराजांनी आदिलशहा किंवा मोगल यांच्याबरोबर संघर्ष करीत असताना आदिलशहा बरोबर जावळीच्या चंद्रराव मोरे यांचा पाडाव व अफजल खानाचा

Late Ramesh Warpudkar ACS College * Sonpeth Pin:-431516 Sonpeth Dist. Parbhani

पराभव हे दोन पराक्रम केले आहेत अफजल खानाच्या संघर्षामध्ये अफजल खानाचा हेतू माहित असून सुद्धा शिवाजी महाराजांनी एवढे धाडस केले की आपले जीव धोक्यात घातला या ठिकाणी गुप्तहेर मार्फत त्याचा हेतू शोधून काढला नसता तर कदाचित शिवाजी महाराजांना धोका झाला असता वहिनी स्वराज्य येथे बुडाले असते शिवाजी महाराज शाहिस्तेखान वरील छापा सुरत लुट आग्रा भेट आग्रा भेटीत तर शिवाजी महाराज आपल्या दुश्मनाच्या दारात जाऊन बसले होते त्यांना ठार मारण्याचा होता परंतु मिर्झाराजे यांच्या पत्रामुळे शिवाजी महाराजाला काही करू नका असे कळविले कारण महाराष्ट्रात आपली सत्ता राहणार नाहीत मराठा चवताळून उठेल तेव्हा औरंगजेबाने शिवाजी महाराजांना ठार मारले नाही व कैदेत ठेवले या प्रत्येक योजनेमध्ये शिवाजी महाराजांनी आपला पराक्रम दाखविला परंतु शिवाजी महाराजांची हेर यंत्रणा किती अचूक होती हे आपल्याला दिसून येते प्रत्येक मोहिमेवर जात असताना शिवाजी महाराजांनी बहिर्जी नाईक याच्यांकडून गुप्त माहिती काढली होती किल्ल्यावरील प्रशासन किल्ल्यावरील भारताच्या ही देखील गुप्तहेर मार्फत शोधून काढले होते म्हणून शिवाजी महाराज मोहिमेमध्ये गुप्तहेर यंत्रणा फार महत्त्वाची होती

**७) संदर्भ ग्रंथ**


१) मराठ्यांचा इतिहास= साहेबराव गाठाळ

२) मराठा शाहीचा मागोवा.... जयसिंगराव पवार

३) हिंदवी स्वराज्य आणि मोगल.. सेतुमाधवराव पगडी

४) मराठी इतिहास.. व्यारमाल वाला शिवाजी विद्यापीठ


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani